# प्रकरण पाचवे

# उपसंहार

# प्रकरण पाचवे

## उपसंहार

एक उत्तम लेखक अशी सतीश जाधव यांची ख्याती आहे. एक प्रतिथयश कादंबरीकार म्हणून ते सर्वपरिचित आहेत. आपल्या प्रदीर्घ अनुभवांशी प्रामाणिक राहून अत्यंत ताटस्थाने, वस्तुनिष्ठतेने मानवी जीवनाचे यथार्थ चित्रण त्यांनी आपल्या लेखनाव्दारे केले आहे. त्यांच्या साहित्याला जीवनमूल्यांचे अधिष्ठान लाभले आहे. मध्यमवर्गीय शेतकरी जीवनातील समस्या आपल्या साहित्यातून - विशेषत: कादंबरीतून मांडल्या आहेत. जीवनाबद्दलचा प्रचंड आशावाद या त्यांच्या जीवनाशी संबधित गोष्टी साहित्यातून आपोआप आल्या आहेत. त्यांचे विविध प्रकारचे अनुभव साहित्यविषय बनून आले आहेत. थोडक्यात, त्यांची जीवननिष्ठा साहित्यनिष्ठा बनून आली आहे. एखादा अनुभव मांडताना सतीश जाधव त्यात खोलवर पोहचतात आणि आपले सत्त्व मांडतात.

सतीश जाधव यांच्या कादंबरी लेखनाचा अभ्यास प्रस्तुत लघुप्रबंधामध्ये केला आहे. तो अधिकाधिक वस्तुनिष्ठ व व्यापक कसा होईल याकडे जाणिवपूर्वक लक्ष दिले आहे. हा अभ्यास करत असताना सुरूवातीलाच 'मराठी कादंबरी' या पहिल्या प्रकरणात एकूणच मराठी कादंबरी वाङ्मयाच्या इतिहासाचा आढावा घेतला आहे. मराठी साहित्यामध्ये कादंबरी विश्व कसे समृध्द होत गेले याचा विचार केला आहे. बाणभट्टाची कादंबरी व सुबन्धूची 'वास्तवदत्ता' यांचे कादंबरी विकसनात महत्त्वाचे स्थान आहे. मध्ययुगीन काळात मुस्लिमांचे राज्य आले, त्यावेळी अरबी व फारशी वाङ्मयाचा व संस्कृतीचा प्रसार झाला पण त्यामुळे कादंबरी वाङ्मयास फारशी चालना मिळालेली दिसत नाही.

हिंदुस्थानात कादंबरी वाङ्मयाचा पुनर्जन्म १५०-२०० वर्षापूर्वी इंग्रजी वाङ्मयाच्या परिचयाने झाला. फील्डिंग यांच्या 'टॉम जोन्स' या पुस्तकाने अर्वाचीन कादंबरीचा जन्म झाला असे काही टीकाकार मानतात. कादंबरी म्हणजे काय? हे सांगताना मा.का.देशपांडे म्हणतात 'कादंबरी म्हणजे जीवनाचे विस्तृत व कलात्मक गद्य - चित्र होय.'

इ.स. १८५७ मध्ये मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. या विद्यापीठातून बाहेर पडलेल्या पदवीधरांची इंग्रजी वाङ्मयाशी ओळख झाली. त्यामुळे वाचक वर्गाचे क्षेत्रही बरेच विस्तीर्ण झाले.

मराठी कादंबरीच्या जन्मामुळेच 'कादंबरी' या वाङ्मय प्रकाराचा १८५० ते १९८० या काळात विविधांगी विकास झाला. उदा. वैचारिक, प्रचारात्मक, कलात्मक इ.

हरिभाऊ आपटे यांनी मराठी कादंबरीला कलात्मक आणि बोधात्मक ऐश्वर्य प्राप्त करून दिले तर फडके - खांडेकर - माडखोलकर यांची कादंबरी ही स्वप्नरंजनात गुरफटून गेली होती. याच काळात हे रिंगण तोडण्याचा प्रयत्न विभावरी शिरूरकर यांच्यासारख्या लेखिकांनी केला.

१९४५ नंतर ग्रामीण साहित्यात एक महत्त्वाची पिढी उदयाला आली. शंकर पाटील यांची 'टारफुला', व्यंकटेश माडगूळकर यांची 'बनगरवाडी', रणजित देसाई यांची 'बारी' या कादंबऱ्यांनी मराठी कादंबरीचे क्षेत्र व्यापक केले. त्याचबरोबर अनेक नवोदित कादंबरीकारांनी आपल्या कादंबऱ्यातून मराठी साहित्य विश्वात भर टाकली.

दुसऱ्या प्रकरणात आपण सतीश जाधव यांच्या व्यक्तित्वाचा व कार्याचा (वाङ्मयीन) परिचय करून घेताना जन्म, शिक्षण, विवाह, स्वभावविशेष तसेच त्यांचे लेखन कथा, कादंबरी, ललितगद्य, वैचारिक लेख, ललित लेख, त्यांना मिळालेले पुरस्कार, प्रकाशित साहित्य, सामाजिक कार्य, शैक्षणिक कार्य, सांस्कृतिक कार्य, साहित्य लेखनामागील हेतू, प्रेरणा या घटकांचा विचार केला. सामान्य माणसाविषयी असणारी आस्था त्यांच्या साहित्यातून जाणवते. सतीश जाधव यांना साहित्यिक उत्तेजन मिळाले ते त्यांच्या आई-वडिलांकडून लहानपणापासूनच त्यांना लेखनाची आवड होती. आपल्याला अनुकूल असलेला लेखन हा कला प्रकारच त्यांनी स्वीकारला.

तिसऱ्या प्रकरणात आपण 'झळ' 'बळ' कादंबरीचे अंतरंग, ग्रामीण भागातील

शेतकऱ्यांचे जीवन, कादंबऱ्यातून घडणारे समाजदर्शन, सामाजिक आशय घबता, शेतकऱ्यांची शोकांतिका, समाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन, कादंबरीस साजेशी भाषाशैली, भाषिक वैशिष्टये व मूल्यमापन तसेच वेधक व्यक्तिचित्रे, व्यक्तिचित्रांना पूरक ठरणारी समूहचित्रे, विविध भावबंध उलगडणारे मनोविश्लेषण, संघर्ष, ग्रामीण समाजाचे स्त्री जीवनाचे दर्शन साहित्यिक संदर्भ यांचे कल्पक आयोजन, वाचकांची उत्सुकता वाढवणारी 'झळ' व 'बळ' कादंबरीची शीर्षके मनाला भावतात.

दिवसेंदिवस खेड्यात सुधारणा होत चालल्या आहेत. खेड्यातील पारंपारिक व्यवसाय कसा आधुनिकतेच्या उंबरठ्यावर लोंबकळला आहे याचे दर्शन घडविताना - समाजाच्या जडणघडणीतसुध्दा कसा बदल झाला आहे तो थोडक्यात 'झळ' मध्ये मांडला आहे. खेड्यातील जुना पाटील आणि त्याची आताची केविलवाणी स्थिती, गेलेल्या वैभवाला पुन्हा मूर्त स्वरूप देण्याचा विचार जरी तरूण पिढीच्या मनात आला तरी बदललेल्या समाजात वावरताना आपणसुध्दा बदलत असतो, त्यावेळी पाटीलकीचा मान पुन्हा प्राप्त करण्यास हा बदल आडवा येतो. त्यामुळे समाजाच्या बदललेल्या चालीरीतीशी जुळवून घेताना तरूण वैभवच्या पिढीला कोणकोणत्या 'झळा' सोसाव्या लागत आहेत याकडे समाजाचे दुर्लक्ष झाले आहे. परंतु खेड्याचाच नव्हे तर सर्व स्तरातील सर्वांच्या घरी 'वैभव' वावरत आहे, आणि तो समाजाचा ज्वलंत प्रश्न आहे. कारण नोकरीसाठी शिक्षण हा काळ संपला आहे. याकडेही लेखकाने लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

'बळ' मध्ये लेखकाने नैसर्गिक आपत्तीच्या व्यवस्थापनासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग उपाय म्हणून करता येतो आणि तोच रामबाण उपचार आहे हे पटवून दिलेले आहे. आपल्या क्षमतेनुसार 'हाताला काम, पोटाला अन्न आणि गाठीला दाम' मिळवून देण्याची ताकद फक्त शेतीमध्येच आहे हे आप्पांसारख्या नोकरीतून निवृत्त झालेल्या लोकांच्या लक्षात येत आहे. अशी दूरदृष्टी असलेली माणसं सेवेतून निवृत्त होऊन

सुध्दा शेतीच्या उद्यमशीलतेचे प्रयोग करून तरूणांनी शेती-उद्योगाकडे आकृष्ट व्हावे म्हणून एक आदर्श घालून देण्याचा प्रयत्न करतात. जीवनाच्या प्रत्येक वळणावर फसणारी तरूण पिढी नवं सकंट बनून समाजापुढे आणि पालकापुढे उभी आहे. कष्टावर विश्वास नसलेले हे तरूण मधल्या मार्गाने झटपट श्रीमंत होण्याच्या हव्यासाने झपाटलेले आहेत. असे तरूण श्रीमंत होण्याचे अनेक मार्ग हाताळताना दिसतात. परंतु तिथेही एक मार्गी सुसूत्रता नसल्याने ते अपयशी होताना पाहायला मिळतात. अपयशातून अपमानीत झालेल्या या तरूणांना जीवनाची दिशाच सापडत नाही. अशा तरूण मुलांना मार्गी लावण्याचे आव्हान सध्या म्हाताऱ्या होत असलेल्या वडिलांसमोर उमेश बनून दंड थोपटून उभे आहे. ते कसे पेलावे, त्याला कसे सामोरे जावे या काळजीने कोळपून जाणारे वृध्द आई बाप आपला वृध्दापकाळ हरीभजनात व्यतित करायचा विसरून ते पुन्हा तरूण होऊन मुलांच्या काळजीत आणि कष्टात घालवताना दिसत आहेत. कादंबरीच्या कथानकास गती देणारे व मनातला भाव व्यक्त करणारे संवाद, ग्रामीण जीवनाचे दर्शन, नैतिकमूल्ये जपणाऱ्या स्त्रिया, सर्व पात्रे विशिष्ट धाग्यांनी बांधलेली जीवन शोधाबरोबर कलात्मक रहस्याचा शोध या वैशिष्टयांमुळे या कादंबऱ्यांची गुणवत्ता वाढली आहे. त्यामुळे लेखन परिणामकारक झाले आहे.

सतीश जाधव यांच्या दोन्ही कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनातील वेगवेगळ्या घटकांचे दर्शन घडते. शेतकऱ्यांचे मनोव्यापार त्याची होणारी पिळवणूक त्याचे होणारे शोषण त्यामुळे तडफडणारे मन आणि त्याच्या निरनिराळ्या स्तरावरच्या कुचंबणा ग्रामीण विश्वाचे मनाला भावलेले, मनात रूतलेले वास्तवदर्शन जसेच्या तसे रेखाटले आहे.

खेड्यापाड्यातील शेतकऱ्यांचे आतून आलेले दु:खाचे हुंकार ऐकणे, समजून घेणे आवश्यक आहे. हे कादंबऱ्यातून जाणवते. कादंबऱ्यातून घडणारे समाजदर्शन व्यापक, विस्तृत, सखोल आहे. त्याचवेळी ते समाजहित सांभाळणारे आहे. या कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनाचा स्पष्ट प्रत्यय येतो. वाङ्मयीनदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या या कादंबऱ्या खरोखरच आपला एक वेगळा ठसा उमटवितात.

चौथ्या प्रकरणामध्ये 'झळ', 'बळ' कादंबऱ्यांमधील नायकांची तडफड रेखाटली आहे. 'झळ' कादंबरीचा नायक विशाल त्याचे आपल्या शेतीवर खूप प्रेम आहे. जास्त शिक्षण न घेता द्राक्षलागवड करून आपली आर्थिक परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न करतो. रात्रंदिवस शेतामध्ये काबाडकष्ट करतो. एखाद्या विचारवंतालाही लाजवेल असे शेतीबद्दलचे तत्त्वज्ञान तो मांडताना दिसतो. 'बळ' कादंबरीचे नायक सेवानिवृत्त शामराव आहेत. पुण्यातील ऐश आरामाचे जीवन सोडून ते गावी शेती करण्यासाठी आलेले असतात. 'पोटासाठी जातोय भटकायला, पण मी नक्की येणार येथे शेवटाला' हे धरती मातेला दिलेले वचन खरे करण्यासाठी ते गावी आलेले असतात. त्यांचा स्वत:च्या जमिनीवर,गावपांढरीवर खूप मोठा विश्वास असतो. सुधारणा झाली पाहिजे यासाठी ते धडपडत राहतात. शिवा,बळी,या तरूणांना ते सुधारणेच्या बाबतीत नेहमीच मार्गदर्शन करायचे व बळीला म्हणायचे, 'नेत्यानं निंदेला, योद्ध्यानं मरणाला, कार्यकर्त्यानं संघर्षाला भ्यायचं नसतं' हे शामरावांचे विचार म्हणजे लेखकाचे विचार होत. या कादंबरीमध्ये व्यक्ती आणि समाजाचा अनोन्यसंबंध आहे हे सूचित केले आहे.

ग्रामीण जीवनाकडे पाहण्याचा शहरी लोकांचा दृष्टिकोन, समर्पक म्हणी, वाक्प्रचारांचा वापर, कादंबरीतील पात्रांना आलेले अनुभवदर्शन, ग्रामीण जीवनात येणाऱ्या अडचणी, त्यांचा आविष्कार, आत्मीयता, मानवी संबंधाचे अनोखे दर्शन, ग्रामीण समाजजीवनाचे प्रत्ययकारी दर्शन, पात्रांना साजेशी भाषा, नाट्यमयता स्पष्ट करणारे संवाद, भाषाशैली, निवेदनपद्धती, कलात्मक आरंभ व शेवट ही वैशिष्ट्ये आहेत. लेखकाने आपल्या कादंबऱ्यांमधून हाताळलेला विषय सर्वाहून खूपच वेगळा आहे. स्वत:च्या अनुभवांना ध्येयात्मकतेची जोड दिल्याने कादंबऱ्या उठावदार झाल्या आहेत. लेखकाला स्त्रियांविषयी आदर आहे. तरूणांच्याबद्दल मनात विलक्षण प्रेम आहे.

LIBRARY

ग्रामीण शेतकरी जीवनाचे विविध पातळ्यांवरील दर्शन, नीतिवादी जीवनविषयक दृष्टिकोन या गुणवैशिष्ट्यामुळे या कादंबऱ्याची गुणवत्ता वाढली आहे. 'झळ' व 'बळ' या सतीश जाधव यांच्या कादंबऱ्यांच्या आधारे काही निरीक्षणे नोंदविता येतात.

१) ग्रामीण शेतकरी जीवनातील अडचणी, मानवी संबंधाचे अनोखे दर्शन, स्वभाव व व्यक्तिचित्रे, विविध भावबंध जीवनातील संघर्ष, ग्रामीण जीवनाचे वास्तववादी दर्शन या कादंबऱ्यातून घडते.

२) सातारी बोली भाषेतील शब्द अलंकार वाक्यप्रचार व म्हणी यांचा केलेला यथार्थ उपयोग, प्राणिमात्रांवरील प्रेम, करूणा कादंबरीला वजन प्राप्त करून देतात.

३) मानवी वर्तन, शेतकऱ्यांचा शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन, रूढी, परंपरा, सण, उत्सव ही आशयसूत्रे सतीश जाधव यांच्या कादंबरीलेखनाची आहेत.

४) प्रत्ययकारी, ग्रामीणभाषा, कादंबरीतील पात्रांच्या मनातील भाव सांगणारे वैशिष्ट्ये संवाद उत्कंठा पूर्ण प्रारंभ परिणामकारक शेवट ही महत्त्वाची रूपे या कादंबऱ्यांची आहेत.

असे असले तरी ग्रामीण शेतकरी जीवनाचे विविध स्तरावरील दर्शन, नैतिक व सामाजिक मूल्य जपणारी स्त्रित्वाच्या धाग्याने बांधलेली स्त्री पात्रे, जीवन शोधाबरोबर मानवी मनाचा शोध घेण्याची लोकांची दृष्टी या वैशिष्ट्यांमुळे कादंबऱ्यांची गुणवत्ता अधिक वाढलेली आहे. गावगाड्याचे बदलते रंगरूप कादंबऱ्यातून जाणवते.

वरील सर्व विवेचनावरून असे म्हणता येईल की सतीश जाधव यांनी आपल्या कादंबऱ्यातून शेतकऱ्यांचे जीवन यथार्थतेने चितारले आहे. पूर्वी एक म्हण होती 'उत्तम शेती, मध्यम व्यवसाय आणि कनिष्ठ नोकरी' आता उत्तम शेती करणारी माणसं समाजात विशालच्या रूपानं, शामरावांच्या रूपानं वावरत आहेत.

अशा प्रकारे चौथ्या प्रकरणामध्ये वेगवेगळ्या घटकांचा विचार आपण केलेला

आहे. वरील सर्व वेगवेगळ्या प्रसंगातून कादंबरी फुलत गेलेली आहे. शेतकऱ्यांच्या भावविश्वाचे प्रभावी चित्रण करून सतीश जाधव यांनी मराठी साहित्यविश्वात निश्चितपणे भर घातली आहे, असे म्हणणे यथोचित होईल.

**प्रकरण पाचवे** - वरील चार प्रकरणामध्ये 'झळ' आणि 'बळ' या कादंबऱ्यांच्या आधारे अनेक मुद्दयांचा अभ्यास मांडला आहे. त्यांचा थोडक्यात सारांशरूपाने आढावा या पाचव्या प्रकरणामध्ये घेतलेला आहे.

# परिशिष्टे

१) संदर्भग्रंथ सूची

२) सतीश जाधव यांचे छायाचित्र व मुलाखत

३) सतीश जाधव यांचे छायाचित्र, संदेश व स्वाक्षरी